सामान्य अध्ययन Test No. 2

## उत्तरतालिका

| प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 26 | 2 | 51 | 4 | 76 | 3 |
| 2 | 2 | 27 | 3 | 52 | 4 | 77 | 1 |
| 3 | 3 | 28 | 4 | 53 | 4 | 78 | 3 |
| 4 | 4 | 29 | 1 | 54 | 2 | 79 | 2 |
| 5 | 1 | 30 | 2 | 55 | 1 | 80 | 1 |
| 6 | 3 | 31 | 4 | 56 | 2 | 81 | 1 |
| 7 | 1 | 32 | 4 | 57 | 4 | 82 | 4 |
| 8 | 4 | 33 | 1 | 58 | 1 | 83 | 1 |
| 9 | 2 | 34 | 3 | 59 | 4 | 84 | 4 |
| 10 | 2 | 35 | 4 | 60 | 1 | 85 | 3 |
| 11 | 2 | 36 | 2 | 61 | 2 | 86 | 1 |
| 12 | 4 | 37 | 1 | 62 | 4 | 87 | 2 |
| 13 | 2 | 38 | 2 | 63 | 2 | 88 | 3 |
| 14 | 3 | 39 | 1 | 64 | 3 | 89 | 4 |
| 15 | 2 | 40 | 3 | 65 | 4 | 90 | 3 |
| 16 | 2 | 41 | 3 | 66 | 2 | 91 | 4 |
| 17 | 1 | 42 | 2 | 67 | 2 | 92 | 2 |
| 18 | 4 | 43 | 1 | 68 | 3 | 93 | 1 |
| 19 | 3 | 44 | 4 | 69 | 2 | 94 | 3 |
| 20 | 2 | 45 | 3 | 70 | 2 | 95 | 1 |
| 21 | 1 | 46 | 3 | 71 | 2 | 96 | 4 |
| 22 | 3 | 47 | 1 | 72 | 3 | 97 | 1 |
| 23 | 2 | 48 | 4 | 73 | 3 | 98 | 4 |
| 24 | 4 | 49 | 1 | 74 | 1 | 99 | 2 |
| 25 | 3 | 50 | 2 | 75 | 3 | 100 | 3 |

## स्पष्टीकरण

**1) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

- लोखंडाचा खिळा पाण्यात बुडतो, पण लोखंडापासून बनवलेले जहाज मात्र पाण्यावर तरंगते, कारण लोखंडाची घनता पाण्याच्या घनतेपेक्षा जास्त असल्याने लोखंडाचा खिळा पाण्यात बुडतो.
- लोखंडाचे जहाज त्याच्या विशिष्ट आकृतीमुळे फार मोठ्या प्रमाणावर पाण्याचे विस्थापन करते. यावेळी जहाजावर पाण्याने प्रयुक्त केलेले प्लावक बल जहाजाचे वजन संतुलित करते त्यामुळे जहाज पाण्यावर तरंगते.

**2) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- सोनार (Sound Navigation and Ranging) :
- यात पाण्याखालील वस्तूचे अंतर व दिशा ठरविण्यासाठी श्रव्यातील ध्वनी तरंगांचा उपयोग करतात.
- उपयोग : समुद्राची खोली काढण्यासाठी होतो.

**3) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

$h = 19.6\ m, u = 0\ m/s$

$g = -9.8\ m/s^2$ (अधोगामी त्वरण)

$s = -h = -19.6\ m$ (अधोगामी विस्थापन)

$u = ?$

$\upsilon^2 = u^2 + 2gs$

$= 2gs$ ----------($\therefore u = 0\ m/s$)

$= 2 \times (-9.8\ m/s^2) \times (-19.6 m)$

$= (19.6\ m/s)^2$

$\therefore \upsilon = -19.6\ m/s$ (अधोगामी वेग)

- जमिनीला टेकण्याच्या क्षणाला वस्तूचा वेग $= -19.6\ m/s$ (अधोगामी वेग)

**4) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- वस्तूवर क्रिया करीत असलेले बल आणि वस्तूचे विस्थापन यांच्या दिशा एकच असताना बलाने केलेले कार्य धन असते.
- वस्तूवर क्रिया करीत असलेले बल आणि वस्तूचे विस्थापन यांच्या दिशा एकच असताना बलाने केलेले कार्य ऋण असते.
- वस्तूवर क्रिया करीत असलेले बल आणि वस्तूचे विस्थापन एकमेकांना लंब असताना बलाने केलेले कार्य शून्य असते. तसेच वस्तूवर बल लावले असताना वस्तूचे विस्थापन होत नसल्यास बलाने केलेले कार्य शून्य असते.

**5) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

✻ कोबाल्ट - 60

- कोबाल्ट हे किरणोत्सारी समस्थानिक असून त्याची एकूण 28 समस्थानिके आढळतात.
- कोबाल्ट-60 चा उपयोग :
  1) कर्करोगाच्या उपचारासाठी रेडिओ थेरपीमध्ये करतात.
  2) गॅमा किरणांच्या निर्मितीसाठी करतात.
  3) वैद्यकीय टाकाऊ पदार्थ स्टर्लाईज करण्यासाठी करतात, अन्नपदार्थांचे शीत पाश्चरीकरण उपचारामध्ये तसेच कारखान्यात रेडिओ ग्राफीमध्ये करतात. (धातूंचे जोडकाम तसेच घनता मोजण्यासाठी)

**6) उत्तर क्रमांक : 3**

**7) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

- सल्फर डायऑक्साईड ($SO_2$)
- कारखान्यातून, ज्वालामुखीतून बाहेर पडणाऱ्या वायूमध्ये सल्फर डायऑक्साइड वायू असतो.
- कोळशाचे ज्वलन होताना सल्फरच्या संयुगांचे ज्वलन होऊन हा वायू बाहेर पडतो.
- गुणधर्म :
  - हा वायू रंगहीन असून याला ठसका आणणारा वास असतो.
  - हा वायू हवेपेक्षा जड असून पाण्यात द्रावणीय

असतो.

- हा वायू आम्लधर्मी असून जलचक्रामध्ये आम्लवर्षासाठी कारणीभूत ठरतो.
- हा वायू विषारी असून शरीरातील फुफ्फुसे तसेच वनस्पतीसाठी अपायकारक असतो.

**8) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- पारपटल सोडून इतर सर्व केंद्रकाचे भाग आहेत.

**9) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

✻ रासायनिक बदल (Chemical Change)

1) लोखंड गंजणे
2) अन्नपचन
3) सजीवांचे श्वसन
4) दुधाचे रूपांतर दह्यात होणे.
5) फळ पिकणे
6) इंधनाचे ज्वलन

''ज्या बदलामध्ये पदार्थांचे फक्त भौतिक गुणधर्म बदलतात तसेच मूळ पदार्थ पुन्हा प्राप्त करता येत नाही अशा बदलांना रासायनिक बदल असे म्हणतात.''

✻ भौतिक बदल (Physical Change)

1) बर्फाचे पाण्यात रूपांतर होणे.
2) वाफेचे संघनन होणे.
3) कागदाचे तुकडे करणे.
4) दुधात पाणी मिसळणे.
5) साखर पाण्यात विरघळणे
6) लोखंडापासून फर्निचर वस्तू बनविणे.

''ज्या बदलामध्ये पदार्थांचे फक्त भौतिक गुणधर्म बदलतात तसेच मूळ पदार्थ पुन्हा प्राप्त करता येतो. अशा बदलांना भौतिक बदल असे म्हणतात.''

**10) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

✻ $6.022 \times 10^{23}$ या संख्येला ॲव्हागड्रो अंक म्हणतात.

- $N_0$ या अक्षराने हा अंक दर्शवतात.
- 1 मोल अणू/रेणूमध्ये नेहमी $6.022 \times 10^{23}$ इतके अणू/रेणू असतात.
  उदा. 1 मोल पाण्यामध्ये $6.022 \times 10^{23}$ इतके रेणू असतात.
- मोल : $6.022 \times 10^{23}$ इतक्या वस्तूंच्या (अणू/रेणू) संचयाला त्या पदार्थांचा एक मोल म्हणतात.

**11) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- धमन्या (Arteries)
- हृदयाकडून ऑक्सिजनयुक्त रक्ताचे वहन करतात.
- अपवाद : फुफ्फुस धमनी (Pulmonary Artery)
- रक्तवाहिन्या (Blood Vessels) :
  रक्तवाहिन्या आपल्या शरीरात रक्ताचे अभिसरण करतात. आपल्या शरिरातील रक्तवाहिन्यांची लांबी 97 हजार किमी असते.

**12) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- हा संघ निडारिया/सिलेंटराटा वर्गातील प्राणी आहे.
- या प्राण्याचा शोध लिव्हेन हूक यांनी लावला.
- याच्या दंश पेशीमधून हिप्नोटॉक्सिन नावाचे विष तयार होते.
- हायड्रा विरडिस्सीमा हिरव्या रंगाचा तर हायड्रा ओलायगॅक्टीस तपकिरी रंगाचा असतो.
- हायड्रामध्ये पुनरूद्भवन क्षमता असते.

**13) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- पाण्यामध्ये प्लॅस्टीकच्या बाटल्यांचा प्रादूर्भाव झाल्यास आयडोनेला सॅक्रिएन्सिस आणि व्हिब्रीओ प्रजातींच्या जीवांणूमार्फत प्लॅस्टीकमधील PET (पॉलिइथिलीन टेरेपथॅलेट) या रासायनिक पदार्थाचे विघटन घडून येते.
- साचलेल्या कचऱ्यामध्ये असलेल्या रबराचे देखील विघटन करण्याची क्षमता काही सूक्ष्मजीवांमध्ये आढळून येते. उदा. ॲक्टिनोमायसिटीस, स्ट्रेटोमायसिस, स्ट्रेटोमायसिस, नॉरकॉडिया, ॲक्टिनोप्लेंस.

**14) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

✻ क्षार, कार्य आणि अभावामुळे होणारे रोग

SRI Competitive Forum

| | क्षार | कार्य | रोग |
|---|---|---|---|
| 1) | कॅल्शिअम | दात आणि हाडांचा विकास रक्त निर्मिती | मुडदूस, अस्थीमृदूता |
| 2) | फॉस्फरस | दात आणि हाडांचा विकास डीएनए, आरएनए आणि एटीपी रेणूंची निर्मिती | मुडदूस अस्थीमृदूता |
| 3) | सोडिअम | रक्तदाब, पोटॅशिअमचे नियंत्रण | हायपोनॅट्रेमिया, उच्च किंवा अल्प रक्तदाब |
| 4) | पोटॅशिअम | रक्तदाब, सोडिअमचे नियंत्रण | हायपाकॅलेमिया, उच्च किंवा अल्प रक्तदाब |
| 5) | लोह | हिमोग्लोबीन निर्मिती | ॲनिमिया (रक्तक्षय) |
| 6) | आयोडीन | थायरॉक्सिन निर्मिती, शारिरीक मानसिक वाढ, ॲटी ऑक्सिडंट | गॉयटर (गलगंड) मिक्झोडायमा. |

**15) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- विखंडन (Fission)
- ज्या पद्धतीमध्ये एका सजीव पेशीचे दोन किंवा अधिक समान भागात विभाजन होते. त्यास विखंडन असे म्हणतात.
- दोन समान भागात विभाजन झाल्यास त्या क्रियेला द्विविखंडन (Binary Fission) असे म्हणतात. उदा. जीवाणू, पॅरामेशिअम (आडवे विखंडन)
- अधिक भागात विभाजन झाल्यास त्याला बहुविखंडन (Multiple Fission) असे म्हणतात. ही पद्धत एकपेशीय सजीवांमध्ये आढळते. उदा.अमिबा, युग्लिना (उभे विखंडन)
- खंडीभवन (Fragmentation) : काही बहूपेशीय सजीवांचे अनेक लहान तंतुमय खंडात रूपांतर होते. पाणी व पोषद्रव्ये योग्य प्रमाणात मिळाल्यावर त्यांची वाढ होऊन नवीन सजीव तयार होतात. या पद्धतीला खंडीभवन असे म्हणतात. उदा. स्पायरोगायरा.
- पुनरूद्भवन/पुनर्जनन (Regeneration) : काही बहुपेशीय प्राण्यांमध्ये त्यांच्या शरीरापासून वेगळ्या झालेल्या भागापासून ते पुन्हा पूर्ण शरीर तयार करतात. यालाच पुनरूद्भवन असे म्हणतात. उदा. प्लॅनेरीया, लिव्हरफ्ल्युक.

**16) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- लिंग गुणोत्तर (Sex Ratio) म्हणजे 1000 पुरूषांमागे असणारी स्त्रियांची संख्या होय.
- धुळे, अकोला व वर्धा यांचे लिंग गुणोत्तर समान म्हणजे 946 एवढे आहे.
- नागपूर व अमरावती या दोन जिल्ह्यांचे - 951
- गडचिरोली व भंडारा यांचे - 982
- नाशिक व बुलढाणा या दोन जिल्ह्यांचे - 934

**17) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

- नाशिक, पुणे व अमरावती या तीन प्रशासकीय विभागात प्रत्येकी 05 जिल्हे आहेत तर औरंगाबाद प्रशासकिय विभागात सर्वाधिक 08, कोकण-07 व नागपूर प्रशासकिय विभागात 06 जिल्हे आहेत.

**1) औरंगबाद प्रशासकिय विभाग :**

- तालूके - 76 तालूके
- क्षेत्रफळ - 64813 चौ.कि.मी.(सर्वात मोठा)
- जिल्हे - औरंगाबाद, परभणी, जालना, लातूर, नांदेड, बीड, उस्मानाबाद, हिंगोली.

2) नाशिक प्रशासकिय विभाग :

- तालूके - 54
- क्षेत्रफळ - 57493 चौ.कि.मी.
- जिल्हे - अहमदनगर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबार.

**3) पुणे प्रशासकिय विभाग**

- तालूके - 58
- क्षेत्रफळ - 57275 चौ.कि.मी
- जिल्हे - पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर.

**4) नागपूर प्रशासकिय विभाग :**

- तालूके - 64
- क्षेत्रफळ - 51377 चौ.कि.मी
- जिल्हे - नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली.

**5) अमरावती प्रशासकियय विभाग**

- तालूके - 56
- क्षेत्रफळ - 46027 चौ.कि.मी.

SRI Competitive Forum

- जिल्हे - अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ.

6) **कोकण प्रशासकिय विभाग**

- तालूके - 50
- क्षेत्रफळ - 30728 चौ.कि.मी.
- जिल्हे - मुंबई शहर, मंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग.

---

**18) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- अरवली पर्वताच्या पश्चिमेकडील भागात म्हणजेच राजस्थान मधील जैसलमेर, बारमेर, जोधपूर व बिकानेर या भागात शुष्क वाळवंटी प्रदेश निर्माण झाला आहे, त्याला राजस्थान मैदान असे म्हणतात.
- राजस्थान मैदानाची भौगोलिक रचना, सपाट भूमी, शुष्क हवामान व रेती यामुळे तेथे जलनिस्सारण होत नाही. त्यामुळे लुनी नदीच्या उत्तरेला अनेक लहान-मोठी खाऱ्या पाण्याची सरोवरे तयार झाली आहेत. त्यापैकी सर्वात मोठे खाऱ्या पाण्याचे सरोवर - सांबर सरोवर.

---

**19) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

- डॉ.त्रिवार्था यांच्यानुसार महाराष्ट्राची विभागणी पुढील तीन हवामान विभागात :

1) Am : Tropical Rain Forest :

- उष्ण कटीबंधीय वर्षारण्याचा हवामान विभाग
- यामध्ये महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीच्या भागाचा समावेश.

तापमान-18.2$^0$C ते 29$^0$ से. दरम्यान

- पर्जन्य - सरासरी 200 से.मी.वार्षीक

2) Aw : Tropical Sawana :

- उष्णकटीबंधीय दमट व कोरडे किंवा मॉन्सून सॅव्हाना
- यामध्ये महाराष्ट्राच्या पठारी प्रदेशाचा समावेश
- सरासरी 150 सेमी वार्षिक पर्जन्य

3) Bs : Tropical Semi Arid-Steppe Climate :

- उष्णकटिबंधीय निम्न शुष्क किंवा स्टेपी हवामान
- सह्याद्रीच्या पूर्व पायथ्यालगतच्या पर्जन्यछायेच्या प्रदेशाचा समावेश, सरासरी पर्जन्य 50 ते 70 सेमी वार्षीक

**20) उत्तर क्रमांक : 2**

---

**21) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

- त्र्यंबकेश्वर येथे गोदावरी व वैतरणा या दोन नद्यांचा उगम
- अमरकंठक येथे नर्मदा व शोण नद्यांचा उगम
- महाबळेश्वर येथे कृष्णा, वेण्णा, कोयना, गायत्री व सावित्री या 05 नद्यांचा उगम होतो.
- तुंगभद्रा नदीचा उगम कर्नाटक मधील चिकमंगळूर जिल्ह्यात होते.

---

**22) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

- 2011 च्या जणगणनेनुसार महाराष्ट्रातील 1.18 कोटी लोकसंख्या झोपडपट्ट्यांमध्ये राहते.
- भारतातील एकूण झोपडपट्ट्यात राहणाऱ्या एकूण लोकसंख्यापैकी 18% लोक महाराष्ट्रातील आहेत.
- महाराष्ट्राच्या एकूण नागरी लोकसंख्येच्या 23.3% लोक झोपडपट्ट्यांत राहतात.

---

**23) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- महाराष्ट्रात आढळणारा कोळसा हा गोंडवाना खडकांशी संबंधित आहे.
- दगडी कोळशाच्या भारतातील एकूण साठ्यापैकी 4% साठे महाराष्ट्रात आढळतात.
- महाराष्ट्रातील एकूण साठ्यापैकी 70% साठे वर्धा व वैनगंगा नदींच्या खोऱ्यात आढळतात.

---

**24) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- महाराष्ट्रातील रस्त्याच्या एकूण लांबीनुसार जिल्हे :
  1) अहमदनगर 2) पुणे 3) नाशिक
- शेवटचे 03- 1) मुंबई शहर 2) मुंबई उपनगर 3) सिंधुदूर्ग
- महाराष्ट्रातील सर्वात जास्त वाहतूकीचा राष्ट्रीय महामार्ग-पुणे बंगळूरू (NH-48)
- महाराष्ट्रातील सर्वात लांब राष्ट्रीय महामार्ग NH-53 (जुना-6)
- NH-53 ची एकूण लांबी 1949 किमी (महाराष्ट्रात-797 किमी)

SRI Competitive Forum

25) **उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

- पाणी संचयन क्षमतेनुसार महाराष्ट्रातील धरणे :
  1) जायकवाडी (गोदावरी) - औरंगाबाद
  2) कोयना (कोयना) - सातारा
  3) उजनी (भीमा) - सोलापूर
  4) इसापूर (पैनगंगा) - हिंगोली

---

26) **उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- भारतीय द्विपकल्पीय पठाराचा राजकीय दृष्ट्या विस्तार राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, झारखंड, महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू, तेलंगणा, आंध्रप्रदेश, या राज्यात झालेला आहे तसेच ईशान्येकडे पठाराचा बहिस्थ विस्तार मेघालय राज्यात आहे.
- पठाराची दक्षिणोत्तर लांबी 1600 कि.मी. तर पूर्व-पश्चिम रूंदी 1400 कि.मी. आहे.
- पठाराचे एकूण क्षेत्रफळ-16 लाख चौ.कि.मी.

---

27) **उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

- राजस्थानमधील जैसलमेर येथे वार्षीक 16 सें.मी. एवढी पर्जन्यवृष्टी होते. तर सर्वाधिक पर्जन्यवृष्टी मेघालय मधील मौसिनराम या ठिकाणी वार्षीक 1221 सें.मी. एवढी पर्जन्यवृष्टी होते.
- भारतातील एकूण वार्षिक पर्जन्यापैकी 74% पर्जन्य नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यापासून जून ते सप्टेंबर या कालावधीत पडते.
- भारतात 76 सें.मी. पेक्षा कमी पाऊस पडणाऱ्या प्रदेशात कृत्रिम जलसिंचनाचा वापर आवश्यक असतो.

---

28) **उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- नागपूर प्रशासकिय विभागात नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर व गडचिरोली या 06 जिल्ह्यांचा समावेश होतो.
- या प्रशासकिय विभागाला अमरावती व यवतमाळ या दोन जिल्ह्यांच्या सिमा लाभलेल्या आहेत.

---

29) **उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

- भारतातील स्थलांतरित शेतीचे प्रकार

| प्रदेश/राज्य | | शेती प्रकार |
|---|---|---|
| - मध्यप्रदेश | - | दाही, बीरा, मशान, पंडा |
| - राजस्थान | - | बत्रा, वालरे |
| - आंध्र प्रदेश | - | पोडू, पेंडा |
| - ओडिशा | - | पामा डबी, विंगा, कोमान, डूंगर |
| - छत्तीसगढ | - | दिप्पा |
| - केरळ | - | पोनम, कुमरी |
| - झारखंड | - | कुरूवा |
| - आसाम (ई.भा) | - | झूम |
| - बुंदेलखंड | - | बेवर, दहियार |
| - हिमालय | - | खिल |
| - पश्चिम घाट | - | कुमारी |

---

30) **उत्तर क्रमांक : 2**

---

31) **उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

✻ राष्ट्रीय आनंद निर्देशांक (GNH-Gross National Happiness) :

- भूतानचे चौथे राजे जिग्मे सिंगे वांगचूक यांनी 1972 मध्ये देशाचे उत्पन्न मोजणारी GNH ही नवीन संकल्पना सुचवली. त्यांच्यानुसार GDP पेक्षा GNH हा महत्त्वाचा निर्देशांक मानला पाहिजे.
- 2011 मध्ये GNH च्या रचनेत काही सुधारणा करण्यात आल्या. सध्या GNH मोजण्यासाठी 9 आयाम (domains), 33 निर्देशांक (indicators) आणि 4 आधारस्तंभ विचारात घेतले जातात.
  1) चांगले शासन
  2) शाश्वत आर्थिक व सामाजिक विकास
  3) सांस्कृतिक जपणूक
  4) पर्यावरणीय जतन

---

32) **उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

✻ वित्त आयोगाची कार्ये :

- केंद्रिय विभाजन योग्य कराची विभागणी करण्यासंदर्भात राष्ट्रपतींना शिफारशी देणे.
- अ) उर्ध्व विभागणी (केंद्र-राज्ये)

SRI Competitive Forum

ब) क्षितिज समांतर विभागणी (राज्य - राज्य)
- भारताच्या संचित निधिमधून राज्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाविषयी धोरण ठरवते.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीसाठी राज्यांच्या संचित निधिमधून वित्तीय मदत वाढवण्या संदर्भात शिफारस करणे.
- राष्ट्रपतींनी सोपविलेली इतर कार्ये करणे.

**33) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**
- असीम दास गुप्ता समिती 2004 या समितीने वस्तू व सेवाकर (VAT) बरोबर GST ची ही शिफारस केली होती.
- तसेच राजा चलैय्या समिती 1991, केळकर समिती 2002 आणि लक्ष्मीकांत झा समिती 1976 मध्ये या समित्यांनीही वस्तू व सेवा कराची शिफारस केली होती.

**34) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**
- उपभोगाच्या मानसशास्त्रीय सिद्धांत : जे.एम.केन्स नी मांडला.
- भांडवलशाही अर्थव्यवस्थेत खालील नियम आढळतात.
- चलनवाढीच्या काळात व्यक्तीच्या उत्पन्नात वाढ होत असते. त्याचबरोबर त्याचा उपभोगावरील खर्च सुद्धा वाढत असतो.
- मात्र, सर्वसाधारणपणे मनुष्याची अशी प्रवृत्ती असते की, आपल्या उत्पन्न वाढीएवढा उपभोगाचा खर्च वाढू देयचा नाही.

**35) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

✼ BF ( Bandhan Financial)
- कार्ये : 1) सूक्ष्म वित्त पुरवठा करणारी एक वित्तीय संस्था आहे.

**36) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**
- नाबार्ड : स्थापना 12 जुलै, 1982
- उद्देश : कृषी व ग्रामीण गैरकृषी क्षेत्राला वित्तपुरवठा करून ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला चालना देणे.
- भारताचा एकात्मिक व शाश्वत विकास होण्याच्या उद्देशाने शिखर संस्था म्हणून 12 जुलै 1982 रोजी स्थापन करण्यात आली.

**37) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**
- QE (Quantitative Easing) म्हणजेच अपरंपरागत चलनविषयक धोरण होय.
- जेव्हा परंपरागत चलनविषयक धोरणाचा अर्थव्यवस्थेवर इच्छित परिणाम होत नाही तेव्हा QE चा वापर करावा.
- QE चा वापर एक शेवटचा पर्याय म्हणून करावा.
- QE ची शिफारस IMF ने केली आहे.

**38) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

✼ नागरी सहकारी बँक
- प्रथम इटली व जर्मनी येथे स्थापन
- भारतात प्रथम विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांनी परस्पर सहकारी मंडळी 1889 मध्ये स्थापन केली.

**39) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

✼ मुद्रा बँक :
- स्थापना - 8 एप्रिल 2015
- उद्देश - सुक्ष्म उद्योगातील रोजगार निर्मिती तसेच भांडवलाची कमतरता इत्यादींचा विचार करून सूक्ष्म उद्योगांना आणखीन पुनर्वित्त पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध होण्यासाठी मुद्रा बँकेची स्थापना करण्यात आली.
- लक्ष्यगट : 1) शिक्षित, कुशल तरूण उद्योजक
  2) महिला
  3) अनुसूचित जाती - जमाती

**40) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

✼ बृहद अर्थशास्त्राला उत्पन्नाचा सिद्धांत देखील म्हणतात.
- बृहद अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची शाखा आहे जी संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या वर्तनाचा आणि कार्यक्षमतेचा अभ्यास करते.

SRI Competitive Forum

- हे बेरोजगारी, विकास दर, सकल देशांतर्गत उत्पादन आणि महागाई यासारख्या अर्थव्यवस्थेतील एकूण बदलांवर लक्ष केंद्रित करते.
- बृहद अर्थशास्त्राला उत्पन्न आणि रोजगाराचा सिद्धांत किंवा उत्पन्न विश्लेषण म्हणून देखील ओळखले जाते, कारण ते अर्थव्यवस्थेमध्ये उत्पन्न आणि रोजगार पातळी कशी निर्धारित केली जाते यावर लक्ष केंद्रित करते. बृहद अर्थशास्त्राचा विषय उत्पन्न आणि रोजगाराच्या निर्धारणाभोवती फिरतो.
- उत्पन्न आणि रोजगार सिद्धांत, हा अर्थव्यवस्थेतील उत्पादन, रोजगार आणि किमतीच्या सापेक्ष पातळीशी संबंधित आर्थिक विश्लेषणाचा एक भाग आहे. या समष्टि अर्थशास्त्रीय घटकांचा परस्परसंबंध परिभाषित करून, सरकारे आर्थिक स्थिरतेला हातभार लावणारी धोरणे तयार करण्याचा प्रयत्न करतात.

**41) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

✼ भारताच्या औद्योगिक धोरणाची उद्दीष्टे :
- हे उत्पादकतेची निरंतर वाढ राखण्यास मदत करते.
- हे लोकसंख्येच्या कामगारांसाठी फायदेशीर रोजगार वाढविण्यात मदत करते.
- मानवी संसाधनांचा अधिकतम उपयोग साधण्यात हे मदत करते.
- हे आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता प्राप्त करण्यास मदत करते.
- हे जागतिक क्षेत्रात एक प्रमुख भागीदार आणि खेळाडू होण्यात देशास मदत करते.
- निरनिराळ्या मार्गांनी देशाची प्रगती वेगवान करण्यात मदत करते.

**42) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

✼ आर्थिक व्यवस्था ही एक यंत्रणा आहे ज्याच्या मदतीने सरकार देशभरात सुलभ सेवा, संसाधने आणि वस्तूंचे नियोजन आणि वितरण करते.
- आर्थिक प्रणाली संपत्ती, श्रम, भौतिक संसाधने आणि व्यावसायिक लोक एकत्र करून उत्पादनाचे घटक व्यवस्थापित करतात.
- आर्थिक प्रणाली अनेक कंपन्या, संस्था, वस्तू, मॉडेल आणि निर्णय प्रक्रिया समाविष्ट करते.

✼ मिश्र अर्थव्यवस्थाः
- सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रांची मालकी असते.
- त्यात कमांड आणि बाजार अर्थव्यवस्था या दोन्हीची वैशिष्ट्ये आहेत.
- या उद्देशासाठी, मिश्र आर्थिक प्रणालींना दुहेरी आर्थिक व्यवस्था म्हणून देखील ओळखले जाते.
- मिश्र अर्थव्यवस्थेत, किमती केंद्रीय नियोजन प्राधिकरणाद्वारे आणि मागणी आणि पुरवठा यांच्याद्वारे निर्धारित केल्या जातात.
- सार्वजनिक क्षेत्रात सरकारची पूर्ण भूमिका असते आणि खाजगी क्षेत्रामध्ये मर्यादित भूमिका असते.

**43) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

✼ किंमतीत कितीही बदल झाला तरी मागणीत कोणताही बदल होत नाही.
- एखाद्या वस्तूच्या (वस्तू किंवा सेवा) किमतीत बदल झाल्यामुळे त्याची प्रभावी इच्छा ज्या प्रमाणात बदलते त्याला मागणीची किंमत लवचिकता किंवा केवळ लवचिकता म्हणतात. सर्वसाधारणपणे, वस्तू अधिक महाग झाल्यामुळे, लोकांना त्या गोष्टींची इच्छा कमी होते.
- PED गुणांकाची संख्यात्मक मूल्ये शून्य ते अनंतापर्यंत असू शकतात.
- साधारणपणे, जेव्हा PED एकपेक्षा कमी असतो (केवळ मूल्यात), तेव्हा वस्तूची मागणी लवचिक (किंवा तुलनेने लवचिक) असते असे म्हटले जातेः म्हणजे, किंमतीतील बदलामुळे वस्तूंच्या प्रमाणात कमी प्रमाणात परिणाम होतो.
- जेव्हा वस्तू PED एकपेक्षा जास्त असतो तेव्हा त्याची मागणी लवचिक (किंवा तुलनेने लवचिक) असल्याचे म्हटले जाते. म्हणजेच, किमतीतील बदलांचा चांगल्या मागणीच्या प्रमाणापेक्षा जास्त परिणाम होतो.
- जेव्हा वस्तू PED एक असतो तेव्हा एकक लवचिक असलेली मागणी दर्शवते; किमतीतील कोणत्याही बदलामुळे मागणीत तंतोतंत प्रमाणात बदल होतो (म्हणजे मागणीत 1% घट झाल्यास किमतीत 1% कपात होईल).
- जेव्हा वस्तूंचे PED गुणांक शून्यासमान असतील तेव्हा पूर्णपणे लवचिक मागणी असेल. म्हणजेच, वस्तूची मागणी किंमतीच्या प्रतिसादात बदलत नाही.

**44) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**
- लोरेंझ वक्र अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचे वितरण

प्रतिनिधित्व करते.

- हे सरळ रेषेतून दर्शविले जाते जे उत्पन्नाचे अचूक वितरण दर्शविते.
- लोरेंझ वक्र त्या रेषेच्या खाली आहे जी उत्पन्नाचे अंदाजे वितरण दर्शविते.
- त्या सरळ रेषा आणि लोरेंझ वक्र यांच्यातील क्षेत्रास जिनी गुणक असे म्हणतात, जे उत्पन्न असमानतेचे प्रमाण दर्शविते.
- वक्र जितके अधिक असेल, तितकी जास्त असमानता.

**45) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

- जसे ग्राहकांचे उत्पन्न वाढत जाते, तशी अधीनस्थ वस्तूंच्या वाढीची मागणी कमी होते आणि जसे उत्पन्न कमी होते तशी अधीनस्थ वस्तूंच्या वाढीची मागणी होते.
- निकृष्ट वस्तूंमध्ये भरड तृणधान्यांसारख्या निकृष्ट दर्जाच्या खाद्यपदार्थांचा समावेश असतो.
- अधीनस्थ वस्तूंची मागणी ही ग्राहकांच्या उत्पन्नाशी तुलनात्मक प्रमाणात असते.

| वस्तूंचे प्रकार | वैशिष्ट्ये | उदाहरण |
|---|---|---|
| अधीनस्थ वस्तू | उपभोक्त्यांच्या उत्पन्नाच्या वाढीनुसार कमी होते | निकृष्ट दर्जाचे अन्न जसे भरड तृणधान्य यांचा समावेश |
| गिफेन वस्तू | गिफेन वस्तू या कमी उत्पन्नासाठी,गैर-चैनीचे उत्पादन आहे ज्याची किंमत वाढली की मागणी वाढते, आणि त्याचप्रमाणे उलट | भाकरीच्या किंमत वाढत आहे कारण मांस खरेदी करण्यासाठी लोकांचे कमी उत्पन्न |
| पूरक वस्तू | ज्या वस्तू एकत्र वापरल्या जातात | चहा आणि साखर, बूट आणि मोजे, पेन आणि शाई |
| पर्यायी वस्तू | ज्या वस्तू एकमेकांसाठी पर्यायी आहेत | चहा आणि कॉफी |

**46) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

- भारतीय संसदीय व्यवस्था जरी ब्रिटिश पद्धतीवर आधारलेली असली तरी दोघांमध्ये दोन मूलभूत फरक आहेत.
  1) भारतीय संसद ब्रिटिश पार्लमेंटप्रमाणे सार्वभौम संस्था नाही.
  2) भारतीय राज्यसंस्था ही एक गणराज्य (Republic) आहे, मात्र ब्रिटिश राज्यसंस्था ही एक घटनात्मक राजेशाही (Constitutional Monarchy) आहे.

**47) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

- 13 डिसेंबर, 1946 रोजी जवाहरलाल नेहरू यांनी घटना (संविधानसभेत) समितीत 'उद्दिष्टांचा ठराव' मांडला होता.
- संविधान सभेने हा ठराव 22 जानेवारी, 1947 रोजी एकमताने संमत केला.
- उद्देशपत्रिकेचे तत्त्वज्ञान :

✼ भारतीय जनतेने स्वीकारलेली आदर्श तत्त्वे :
  1) सार्वभौम
  2) समाजवादी
  3) धर्मनिरपेक्ष
  4) लोकशाही
  5) गणराज्य

✼ भारतीय जनतेच्या आकांक्षा (उद्देश)
  1) न्याय
  2) स्वातंत्र्य
  3) समता
  4) बंधुता

- 26 नोव्हेंबर, 1949 रोजी राज्यघटनेची स्वीकृती करण्यात आली.
- 26 जानेवारी, 1950 पासून राज्यघटनेच्या अंमलबजावणीस सुरूवात करण्यात आली.

**48) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (Comptroller and Auditor General of India : CAG of India)
- ते भारतीय लेखा व लेखापरीक्षण विभागाचे प्रमुख असतात.
- ते सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोग यांच्या प्रमाणेच भारतातील लोकशाही शासनव्यवस्थेतील एक प्रमुख आधार आहेत.
- त्यांचा पदावधी संपल्यानंतर ते भारत सरकारच्या किंवा

SRI Competitive Forum

राज्य सरकारच्या नियंत्रणाखालील कोणतेही पद धारण करू शकत नाहीत.

- कलम 148 नुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक हे स्वतंत्र घटनात्मक पद आहे.

**49) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

- सर्व राज्यांमध्ये विधान परिषद असावी, ही तरतूद संविधान सभेमध्ये पुढील कारणांवरून फेटाळण्यात आली.
  1) विधान परिषद लोक प्रतिनिधीत्वावर आधारलेली नाही.
  2) तिच्या अस्तित्वामुळे कायदेकारी प्रक्रियेस विलंब होतो.
  3) तिच्या अस्तित्वामुळे राज्याच्या खर्चात वाढ होते.
- या कारणांमुळेच राज्यघटनेने विधान परिषद निर्माण करण्याबाबत किंवा भंग करण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार राज्य विधानसभेला देण्यात आला आहे.

**50) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणूकीतील SC, ST इतर मागासवर्गीय महिला यांच्याकरिता राखीव जागांची संख्या ही कायद्यातील प्रमाणानुसार राज्य निवडणूक आयोग निश्चित करतो.
- राखीव जागाकरिता सोडत पद्धतीने मतदारसंघ निश्चित केले जातात.
- जिल्हा परिषदेला स्थावर व जंगम मालमत्ता संपादन करण्याचा अधिकार आहे. ती मालमत्ता त्या जिल्ह्यात किंवा जिल्ह्याबाहेर असू शकते.

**51) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- कार्यकारी मंडळ व विधिमंडळ यांच्यातील संबंधांच्या आधारे आधुनिक लोकशाही सरकारचे संसदीय अध्यक्षीय असे दोन भाग पडतात.
  1) ज्या प्रणालीमध्ये धोरणे व कृतींसाठी कार्यकारी विभाग विधिमंडळाला उत्तरदायी असतो, ती संसदीय प्रणाली असते.
  2) अध्यक्षीय प्रणालीमध्ये धोरणे व कृतींसाठी कार्यकारी विभाग विधिमंडळाला उत्तरदायी नसतो आणि त्यांच्या कार्यकालाबाबत घटनात्मकदृष्ट्या विधिमंडळापासून स्वतंत्र असतो.
- संसदीय शासन प्रणालीमध्ये कार्यकारी मंडळ हे कायदेमंडळाचाच एक भाग असतो.
- अध्यक्षीय शासन प्रणालीमध्ये नामधारी प्रमुख व वास्तव प्रमुख हा एकच असतो.
- ब्रिटनमध्ये पंतप्रधान हा केवळ कनिष्ठ सभागृहाचाच असू शकतो.

**52) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- राज्यघटनेतील कलम 23 : माणसांचा अपव्यापारास व वेठबिगारीस मनाई
- अपव्यापार = माणसाचा अयोग्य पद्धतीने व्यापार होऊ नये.
- वेठबिगारी = कामाच्या बदल्यात योग्य मोबदला मिळावा.
- माणसाचा अपव्यापार यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.
  1) माणसाची खरेदी-विक्री
  2) गुलामगिरी
  3) माणसांचा अनैतिक व्यापार

  उदा. महिला विक्री, लहान मुलांची विक्री

  4) देवदासी प्रथा

**53) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- राज्यपाल खालील प्रकारचे विधेयके राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवू शकतील.

  अ) घटनेशी विसंगत असलेले विधेयक.

  उदा.मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, इत्यादी.

  ब) देशाच्या व्यापक हिताशी विसंगत असलेले विधेयक.

**54) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- राज्यघटेच्या विविध भागांत केलेल्या अनेक व महत्त्वाच्या बदलांमुळे 42 वी घटनादुरूस्ती अधिनियम

SRI Competitive Forum

(1976) हा 'लघु-राज्यघटना' (Mini-Constitution) म्हणून ओळखला जातो.

**55) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

- राज्यपाल खालील अहवाल राज्य विधिमंडळासमोर मांडतात. 1) CAG 2) SPSC 3) राज्य वित्तीय आयोग (कलम 243(I) (Y))
- राष्ट्रपती खालील अहवाल संसदेसमोर मांडतात.
  1) CAG
  2) UPSC
  3) वित्तीय आयोग (कलम 280)
  4) राज्यघटनात्मक राष्ट्रीय आयोग (कलम 338, 338A, 340)

**56) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- ड्यूक ऑफ कनॉट यांच्या सत्कार प्रसंगी केलेल्या भाषणात फुले यांनी शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे रेखाटन अत्यंत वस्तुनिष्ठतेने मांडले होते.

**57) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

* साताऱ्यातील प्रतिसरकार :
- 1942 च्या चलेजाव चळवळीत मुंबई प्रांतातील सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार स्थापन करण्याचे प्रयत्न झाले.
- साताऱ्यातील प्रतिसरकार हे 1 जून 1943 पासून 13 जून 1946 पर्यंत म्हणजे तीन वर्षांहून अधिक काळ कार्यरत होते.
- प्रति सरकारातील नेते हे शेतकरी कुटुंबातले होते. नाना पाटील, किसन वीर यांच्या नेतृत्वाखाली हे सरकार अस्तित्वात आले.

**58) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

- जिवंत बॉम्ब पोटाला बांधून गरोदरपणाचे नाटक करत कोलकत्यापर्यंत जाऊन क्रांतिकारकांकडे यशस्वीपणे बॉम्ब पोहोचवणाऱ्या आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांना पन्नास वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा झाल्यावर इंग्रजांनी घरातून बाहेर काढल्यानंतर गोठ्यात राहणाऱ्या या यशोदा गणेश सावरकर, यमुना विनायक सावरकर आणि शांताबाई नारायण सावरकर या महिला होत्या.

**59) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- 1939 मध्ये सुभाषचंद्र बोस यांना काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर आपल्या डाव्या सहकाऱ्यांसह त्यांनी 'फॉरवर्ड ब्लॉक' ची स्थापना केली.
- डाव्या विचारसरणीच्या प्रतिष्ठित व्यक्ती स्वामी सहजानंद सरस्वती, प्रा.एन.जी.रंगा आणि इंदुलाल याज्ञिक.

**60) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

- इ.स. 1915 च्या सुरूवातीला 'न्यू इंडिया' व 'कॉमनविल' या आपल्या वृत्तपत्रांतून ॲनी बेझंट यांनी आपली मोहीम सुरू केली.
- ब्रिटिश साम्राज्यातील गोऱ्या वसाहतींच्या धर्तीवर, महायुद्धानंतर भारतालाही स्वराज्य (किंवा वसाहतीचे स्वातंत्र्य) मिळावे यासाठी, त्यांनी सार्वजनिक सभा व परिषदा आयोजित केल्या.

**61) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- 1884 मध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांनी बॉम्बे मिल अँड मिलहॅण्डस असोसिएशन ही संघटना स्थापन केली.
- व्हँकुव्हरच्या जी.डी.कुमार यांनी लंडन मधील इंडिया हाऊसच्या धर्तीवर स्वदेशी सेवक ही संस्था स्थापन केली.
- इ.स.1904 मध्ये विनायक दामोदर सावरकर यांनी 'अभिनव भारत' ही क्रांतिकारकांची गुप्त संघटना स्थापन केली.
- बारिसालमधील एक शिक्षक अश्विनीकुमार दत्त यांनी 'स्वदेश बांधव समिती' या स्वयंसेवक दलाची स्थापना केली.

**62) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- वेव्हेल योजना : मार्च 1945

SRI Competitive Forum

- त्रिमंत्री योजना : 1946
- क्रिप्स मंडळ : 1942
- ऑगस्ट प्रस्ताव : 1940

**63) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- बंगालमध्ये राष्ट्रवादी कलाकारांचा एक नविन गट अबनिंद्रनाथ टागोरांसोबत 1871-1951 च्या दरम्यान जोडला जाऊ लागला होता.
- अबनिंद्रनाथ टागोर हे रविंद्रनाथ टागोरांचे भाचे होते.
- नंदलाल बोस हे अबनिंद्रनाथ टागोरचे विद्यार्थी होते.

**64) उत्तर क्रमांक : 3**

**65) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

✼ ईस्ट इंडिया असोसिएशन :

- भारतीय लोकांची गाऱ्हाणी ब्रिटिश सरकारपुढे मांडण्यासाठी 1 नोव्हेंबर 1866 रोजी दादाभाई नौरोजींनी लंडनमध्ये ईस्ट इंडिया असोसिएशनची स्थापना केली.
- उद्देश : लोकशिक्षण
- त्यांचा ब्रिटिशांच्या न्यायप्रियत्तेवर विश्वास होता.
- ते सनदशीर व घटनात्मक मार्गाने चळवळ करावी या मताचे पुरस्कर्ते होते.

**66) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- कातड्यापासून बनणाऱ्या वस्तूंचे काम करणाऱ्या लोकांना एकत्र करून त्यांची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी घासीदास यांनी 19 व्या शतकात मध्य भारतात आंदोलन केले.

**67) उत्तर क्रमांक : 2**

**68) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

✼ वैयक्तिक सत्याग्रह

- पवनारमध्ये वैयक्तिक सत्याग्रह चळवळीचे नेते आचार्य विनोबा भावे यांनी ही चळवळ सुरू केली.
- 17 ऑक्टोबर 1940 रोजी विनोबा भावे यांनी वैयक्तिक सत्याग्रहाचे उद्‌घाटन केले.
- हेतू : 1) भारतीयांच्या तीव्र राजकीय भावना व्यक्त करणे.

  2) भारतीयांच्या मागण्या शांततेने मान्य करण्याची संधी ब्रिटिश सरकारला देणे.

**69) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

✼ मिठाचा सत्याग्रह :

- 12 मार्च ते 5 एप्रिल 1930 या काळात गांधीजींनी साबरमती ते दांडी हे 230 मैलाचे अंतर आपल्या अनुयायासह पायी चालून पूर्ण केले.
- गांधीजींनी मिठाचा कायदा मोडला तेव्हा त्यांच्या सोबत कमलादेवी चट्टोपाध्याय, अवंतिका गोखले, हंसा मेहता, लीलावती मुन्शी, दादाभाई नौरोजींची नात पेरीन कॅप्टन या स्त्रिया होत्या.

**70) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

- वि.रा.शिंदे हे अस्पृश्यतेच्या प्रश्नाचे संशोधन करणारे पहिले संशोधक म्हणून ओखळले जातात.
- 1933 मध्ये त्यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा पहिला ग्रंथ लिहिला.
- वि.रा.शिंदे यांच्या विचाराचा प्रभाव डॉ. आंबेडकर यांच्या संशोधनावरही पडलेला दिसतो.

**71) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

✼ 2020-पुरस्कार

1) साहित्य अकादमी पुरस्कार - 2020

- नंदा खेर यांच्या 'उदया' कादंबरीसाठी.
- नंदा खरे यांच्या 'उदया' या कादंबरीला पुरस्कार मिळाला.
- त्यांनी कोणताही पुरस्कार न स्वीकारण्याचा निर्णय घेतलेला आहे.

2) साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार 2020

- सोनाली नवांगुळ यांच्या 'मध्यरात्रीनंतरचे तास' या कादंबरीसाठी.
- पुरस्काराची सुरूवात : 1989

3) बालसाहित्य पुरस्कार : आबा महाजन यांच्या 'आबाची गोष्ट' कथासंग्रहाला

4) युवा साहित्य पुरस्कार 2020 : प्राजक्त देशमुख यांच्या 'देव बाभळी' या साहित्याला.

SRI Competitive Forum

**72) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

✻ जलसमृद्धिसाठी वळण योजना

- पश्चिमेकडील वाहून जाणारे पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्यास देण्याकरिता 'वळण योजना' पूर्ण करण्याच्या कालबद्ध कार्यक्रमाची अंमलबजावणी.
- प्रकल्पासाठी 'प्रकल्प तयारी कक्ष' कार्यान्वित करण्यात आला.
- कालवा सिंचन प्रणालीचे आधुनिकीकरण करण्यासाठी समितीची स्थापना.
- कुकडी प्रकल्पाच्या इतिहासात प्रथमच उन्हाळी हंगामात 2 आवर्तने यशस्वीपणे पूर्ण.

**73) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

✻ प्रलय क्षेपणास्त्र

- कमी पल्ल्याचे आणि जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या प्रलय या दिग्दर्शित आंतरखंडीय क्षेत्रणस्त्राची (गायडेड बॅलिस्टिक मिसाईल) दुसरी चाचणी 23 डिसेंबर 2021 रोजी ए.पी.जे.अब्दुल कलाम बेटावरून घेण्यात आली.
- पहिली चाचणी 22 डिसेंबर 2021 रोजी.
- ए.पी.जे. अब्दुल कलाम बेट ओडिशातील बालासोर किनाऱ्याजळ आहे.
- हे क्षेपणास्त्र DRDO (संरक्षण संशोधन आणि विकास संस्था) ने विकसित केलेले आहे.
- प्रलय क्षेपणास्त्र 350-500 किलोमीटर इतका पल्ला पार करू शकते.
- क्षेपणास्त्र जमिनीवरून जमिनीवर डागले जाते.
- क्षेपणास्त्राद्वारे 500 ते 1000 किलोग्रॅम वजन वाहून नेता येते.
- हे क्षेपणास्त्र घन इंधनावर चालणारे क्षेपणास्त्र आहे.

✻ प्रलय बदल -

- वेग : 1225 किमी./तास
- पल्ला : 350-500 कि.मी.
- संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (DRDO)
- स्थापना : 1958
- मुख्यालय : नवी दिल्ली
- घोषवाक्य : बलस्य मूलं विज्ञानम

**74) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

✻ अॅन्टोनियो गुटेरस

- संयुक्त राष्ट्रसंघाच्या सरचिटणीसपदी गुटेरस यांची फेरनिवड करण्यात आली.
- ते संघाचे नववे सरचिटणीस आहेत.
- 71 वर्षीय गुटेरस पोर्तुगालचे माजी पंतप्रधान.
- 2005 ते 2015 या काळात गुटेरस यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या निर्वासितांच्या प्रश्नावर उच्चायुक्त म्हणून जबाबदारी पार पाडली.
- 1992 ते 2002 या काळात गुटेरस हे पोर्तुगालमधील सोशालिस्ट पक्षाचे सरचिटणीस होते.
- 1995 साली ते पोर्तुगालचे पंतप्रधान म्हणून निवडले गेले.
- 2002 पर्यंत ते या पदावर विराजमान होते.
- 1999 ते 2005 या काळात गुटेरस हे सोशालिस्ट इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय स्तरावरील समाजवादी संघटनेचे अध्यक्ष होते.

✻ संयुक्त राष्ट्रसंघ

- स्थापना : 24 ऑक्टोबर 1945
- मुख्यालय : न्यूयॉर्क अमेरिका.
- सहा अधिकृत भाषा : 1) अरेबियन, 2) चायनिज, 3) इंग्रजी, 4) फ्रेंच, 5) रशियन, 6) स्पेनिस.
- सदस्य : 193 (2 निरीक्षक देश)

**75) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

✻ जागतिक दिव्यांग पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा

- जागतिक दिव्यांग पॉवरलिफ्टिंग स्पर्धा जॉर्जिया येथे आयोजित करण्यात आली होती.
- या स्पर्धेत भारताच्या परमजित कुमार यांना कांस्य पदक पटकवत नवा इतिहास रचला.
- जागतिक दिव्यांग पॉवर लिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत पदक पटकावणारा परमजित पहिला भारतीय दिव्यांग खेळाडू ठरला.
- परमजित याने 49 किलो वजनी गटात 128 कि.ग्रॅ. वजन उचलून कांस्य पदक पटकावले.
- या स्पर्धेत इजिप्तच्या उमर शमी करादा याने सुवर्ण तर व्हिएतनामच्या वाग कोंग ले यांनी रौप्यपदक जिंकली. यापूर्वी इंडोनेशिया 2018 साली झालेल्या आशियाई दिव्यांग स्पर्धेत परमजितने 49 किलो वजनी गटात कांस्य पदक पटकावले होते.
- जागतिक दिव्यांग पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेचे हे 9 वे सत्र होते.

SRI Competitive Forum

76) **उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

✻ धोलावीरा भारताचे 40 वे वारसास्थळ

- गुजरातच्या कच्छच्या हडप्पाकालीन शहर असलेल्या धोलावीरा या स्थळाला जुलै 2021 महिन्यात झालेल्या 44 व्या जागतिक वारसा समितीच्या बैठकीत वारसा स्थळ म्हणून मान्यता देण्यात आली.
- 44 व्या बैठकीत 37 नवीन वारसास्थळे घोषित. त्यातील 29 सांस्कृतिक तर 08 नैसर्गिक वारसास्थळे आहेत.
- या बैठकीत भारताचे 2 नवीन वारसास्थळे घोषित.
  1) काळतीय रूद्रेश्वर (तेलंगणा)
  2) धोलावीरा (गुजरात)
- वारसास्थळांच्या यादीत भारताचा 6 वा क्रमांक लागतो.
- 45 वी जागतिक वारसा समितीची बैठक 2022 साली रशिया या देशात होणार आहे.

77) **उत्तर क्रमांक : 1**

78) **उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

- भारतीय वायुसेनाने ऑपरेशन संजीवनीच्या माध्यमातून आवश्यक औषध तसेच दवाखान्यासाठी उपयुक्त सामुग्री 6.2 टन मालदीवला दिली.

79) **उत्तर क्रमांक : 2**

80) **उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

✻ ए.रामचंद्रन :

- ते एक मत्स्य शेतीतज्ञ होते.
- प्रख्यात मत्स्य शास्त्रज्ञ आणि केरळ विद्यापीठातील मत्स्य पालन आणि सागर अभ्यास विद्यापीठाचे कुलगुरू होते.
- त्यांचे वयाच्या 61 वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

81) **उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

- ब्लूमबर्ग ने जाहीर केलेल्या अब्जाधिशांच्या यादित एलन मस्क यांना जगातील सगळ्यात श्रीमंत व्यक्तीचे स्थान देण्यात आले.
- या सूचीत एकुण 500 अब्जाधीशांचा समावेश आहे. त्यांनी अमेजॉनचे मालक जेफ बेजोस यांना मागे टाकत हे स्थान मिळवले आहे.
- एलन मस्क यांची नेटवर्थ 188 बिलियन यूएस डॉलर ने अधिक झाली आहे जी बेजोस यांच्यापेक्षा एक बिलियन डॉलरने जास्त आहे.

82) **उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- केंद्राने लडाखमध्ये सिंधु नदीवर 144 मेगावॅट क्षमतेचे आठ जलविद्युत केंद्र निर्माण करण्यास मंजुरी दिली.

✻ ही आठ जलविद्युत केंद्रे कारगिल आणि लेह जिल्हयांदरम्यान असतील.

83) **उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

- केंद्राने आर्थिक वर्ष 2020-2021 मध्ये जीडीपी चा विकास दर 7.7 टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे.

✻ 2019-20 मध्ये देशाचा जीडीपी 4.2 % होता.

84) **उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

- भारत दोन वर्षांसाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद (UNSC) चा अस्थायी सदस्य बनला आहे. (04 जानेवारी 2021 पासून पुढे)

✻ भारतासोबतच नार्वे, केनिया, आर्यलँड आणि मेक्सिको हे संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे अस्थायी सदस्य बनले आहेत.

85) **उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

- गुजरात राज्य सरकाने किसान सूर्योदय योजना सुरू केली आहे.

✻ शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसा वीज पूरवठा करण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू केली आहे. शेतकऱ्यांना सकाळी 5 ते रात्री 9 वाजेपर्यंत वीज पुरवठा केला जाणे नियोजित आहे. यासाठी राज्याने 2023 पर्यंत 3500 कोटी रुपयांचे बजेट निर्धारीत केले आहे.

86) **उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

5 x 2 = 5 + 2 = 7 ; 5 - 2 = 3 = 73

7 x 4 = 7 + 4 = 11 ; 7 - 4 = 3 = 113

8 x 3 = 8 + 3 = 11 ; 8 - 3 = 5 = 115

SRI Competitive Forum

9 x 4 = 9 + 4 = 13 ; 9 - 4 = 5 = 135

∴ 6 x 5 = 6 + 5 = 11 ; 6 - 5 = 1 = 111

**87) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

ba **b** b **b** ab **b** b **a** bb

- bbba हि अक्षरे गाळलेल्या जागी, भरल्यास babb हा लयबद्ध अक्षरगट पुन्हा पुन्हा येतो.

**88) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

24, 36, 48 यांचा LCM = 144

एकूण काम 144 मानू,

| | | |
|---|---|---|
| A 24 | | 6 |
| B 36 | 144 | 4 |
| C 48 | | 3 |
| ↓ | ↓ | ↓ |
| दिवस | एकूण काम | कार्यक्षमतेचे गुणोत्तर |

A + B ने केलेले काम = 6 x (6+4)

= 6 x 10 = 60

राहिलेले काम = 144−60 = 84

B + C चे दिवस = $\frac{84}{(4+3)} = \frac{84}{7}$ = 12 दिवस

**89) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

| | |
|---|---|
| A फ्रिज | B फ्रिज |
| 15% नफा | 9% तोटा |
| 9 : | 15 − खरेदीचे गुणोत्तर |

$\therefore \frac{21600}{9+15} = \frac{21600}{24} = 900$

$\therefore A = 900 \times 9 = 8100$

$B = 900 \times 15 = 13500$

**90) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**

$2^4=16$ ; $4^4=256$

$3^4=81$ ; $1^4=1$

$4^4=256$ ; $5^4=625$

**91) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

I) स्वत: चा स्वतंत्र संगणक ही फक्त हौस नाही, म्हणून I चूक

II) कौशल्याचा विकास फक्त स्वत: च्या संगणकामुळेच होतो, असे नाही. म्हणून II चूक

**92) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

5 ने भाग जाणाऱ्या संख्या = $\frac{1000}{5} = 200$

7 ने भाग जाणाऱ्या संख्या = $\frac{1000}{7} = 142$

एकूण = 342


7 आणि 5 ने भाग जाणाऱ्या संख्या = $\frac{1000}{35} = 28$

$$\therefore \begin{array}{r} 342 \\ -28 \\ \hline 314 \end{array}$$

**93) उत्तर क्रमांक : 1**

**94) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**




पायथागोरसच्या प्रमेयानुसार

$(AC)^2 = 5^2 + 12^2$

$= 25 + 144$

$AC^2 = 169$

$\therefore AC = 13$ मीटर

दिशा = नैर्ऋत्य

**95) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

दोन वर्षाचे सरळव्याज 16,000

म्हणजे दरवर्षी = $\frac{16000}{2} = 8000$

8000 8000

960

$\therefore$ 8000−960

100 −?

$\frac{100 \times 960}{8000} = 12$

$\therefore$ 12%

**96) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**

रेल्वेचा वेग = $\frac{600}{(50-30)} = \frac{600}{20} = 30$ m/s

रेल्वेची लांबी = $30 \times 30$ = 900 मीटर

**97) उत्तर क्रमांक : 1**

**स्पष्टीकरण :**

नम्रता

↑

1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13,

दिव्या

↑


14, 15, 16, 17, 18, 19, 20,21,22,23,24

↓


कल्पना

**98) उत्तर क्रमांक : 4**

**स्पष्टीकरण :**




I




II

I) सर्व वाघ, हरिण आहेत. म्हणजे, काही वाघ हरिण असतातच.

II) संभाव्य आकृती I आणि II नुसार निष्कर्ष II किंवा III बरोबर येणार

**99) उत्तर क्रमांक : 2**

**स्पष्टीकरण :**

महिना : दिवस

मार्च − 23 − 8 मार्च पासून पुढे

एप्रिल − 30

मे − 31

जून − 30

जुलै − 31

ऑगस्ट = 07 − भाला फेक दिवस 7 ऑगस्ट ला

एकूण = 152 असतो.


$\frac{152}{7}$ = 5 बाकी उरते.

$\therefore$ मंगळवार पासून 5 दिवस पुढे

$\therefore$ रविवार येतो.

**100) उत्तर क्रमांक : 3**

**स्पष्टीकरण :**




4 : 12

1 : 3

SRI Competitive Forum


SRI Competitive Forum
SRI Competitive Forum
राज्यसेवा पूर्व परीक्षा 2023
Online Test Series
एकूण 2300
प्रश्नांचा सराव
फक्त 699 रू
17 सराव टेस्ट
वैशिष्ट्ये
एकूण 100 गुणांच्या 17 आदर्श सराव प्रश्नपत्रिका (स्पष्टीकरणासह).
थेट आयोगाशी सुसंगतपणा साधारणो काही प्रश्न तर काही प्रश्न स्पष्टीकरणाच्या माध्यमातून म्हणजेच जवळजवळ 30 ते 40 (प्रश्नासाठी नक्कीच फायदेशीर) प्रश्न नक्कीच सुटतील.
आयोगाच्या धर्तीवर काठिण्यपातळीनूसार प्रश्नांची मांडणी.
आयोगाने प्रत्येक विषयाला दिलेल्या प्रश्न संख्येच्या महत्त्वानुरूप सर्व विषयांच्या विस्तृत स्पष्टीकरणासह.
प्रत्येक प्रश्नपत्रिका व प्रत्येक प्रश्नपत्रिकेचे स्पष्टीकरण Online PDF स्वरूपात उपलब्ध.
प्रत्येक प्रश्नपत्रिकेचे सविस्तर विश्लेषण.
Join Telegram : SRI Competitive Fourm
मार्गदर्शक :
रेखा दाताळ मॅडम
M.A. (C-SAT, भूगोल - लेखिका)
(संचालिका-SRI Competitive Forum)
TEST SERIES साठी आजच
SRI Competitive Forum
App Download करा.
संपूर्ण टेस्ट सिरीज
SRI Competitive Forum App
वर उपलब्ध
GET IT ON Google Play
अधिक माहितीसाठी संपर्क : 8087849865


SRI Competitive Forum
SRI Competitive Forum
ONLINE TEST SERIES- स्पष्टीकरणासह
क्र. टेस्ट एकूण टेस्ट किंमत
1 राज्यसेवा पूर्व परीक्षा 2023 17/2300 प्रश्नांचा सराव 1499 / 699
2 संयुक्त पूर्व परीक्षा 2023 14/2000 प्रश्नांचा सराव 699 / 199
3 तलाठी भरती 2023 10/1600 प्रश्नांचा सराव 149
4 पोलीस भरती (मुंबई) परीक्षा 2023 10/1000 प्रश्नांचा सराव 99
5 पोलीस भरती (मुंबई) परीक्षा 2023 10 प्रश्नपत्रिका आयोगाच्या Free
Join Telegram : SRI Competitive Fourm
मार्गदर्शक
रेखा दाताळ मॅडम
(संचालिका-SRI Competitive Forum)
संपूर्ण टेस्ट सिरीज
SRI Competitive Forum App
वर उपलब्ध
GET IT ON Google Play
SRI Competitive Forum
संपर्क : 8087849865